पुणे, वर्ष १, अंक १० ऑगस्ट २०११ ₹ ३०

# अर्थपूर्ण

व्यक्ती, समाज आणि देशाच्या परिपूर्ण विकासासाठी...

## आर्थिक स्वातंत्र्याचा जाहीरनामा

## १५ ऑगस्ट २०१२



भूमिका

# एक फुलस्टॉप!

यमाजी मालकर
ymalkar@gmail.com

भारत हा अतिशय समृद्ध देश होता आणि आहे, यावर ज्याचा ठाम विश्वास आहे,
देशाच्या उज्वल परंपरांचा आविष्कार आजच्या दैनंदिन जीवनात जो शोधतो आहे,
कला-संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी हात पसरण्याची वेळ का, हा प्रश्न ज्याला सतावतो आहे,
प्रत्येक भारतीयाला मानवी प्रतिष्ठेचे जीवन जगता आले पाहिजे, असे ज्याला वाटते,
भारतीय नागरिकाला कोणत्याही भेदभावाविना संधी मिळावी, असे ज्याचे म्हणणे आहे,
भारत 'समृद्ध मानवी आयुष्य जगण्याची' महासत्ता होण्याचे स्वप्न जो पाहतो आहे,
ज्याला शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा देशासमोरील सर्वांत चिंतेचा विषय वाटतो आहे,
ज्याची नाळ ग्रामीण भागाशी जोडलेली आहे, मात्र तेथील वास्तवाने जो अस्वस्थ आहे,
वर्तमानातले वास्तव पाहून ज्याला आपल्या मुलांच्या भवितव्याची चिंता सतावते आहे,

प्रत्येकाला प्रामाणिकपणे जगता आले पाहिजे, असे ज्याला मनापासून वाटते,
'जगा आणि जगू द्या' या न्यायतत्त्वावर ज्याचा विश्वास आहे,
आज भरल्या ताटावर बसलेल्या ज्याचा घास सारखा अडतो आहे,
नवे काही घडू शकते आणि आपणही ते घडवू शकतो, असे ज्याला मनापासून वाटते,

गर्भातच होणारी आपलीच हत्या जिला मूकपणे पाहावी लागते,
कळी उमलतानाच तिचा भाव करणारे जग जी सहन करते आहे,
महागाई फार झाली, 'दुसऱ्या इंजिना'शिवाय पर्याय नाही, म्हणून जी घराबाहेर पडली आहे,
जिच्या हातात महिनाअखेर काही गिन्न्या, काही नोटा पडतात,
आणि बदल्यात घरातल्या अमूल्य, अतूल्य नात्याची जी परतफेड करते आहे,
जिला वाटते, हे खरे नाही, हे बदललेच पाहिजे,
पण जिच्यावर व्यवस्थेने लादली आहे, करकरीत व्यवहाराची लक्ष्मणरेषा,

केवळ माणसांची अदलाबदल करून देश बदलणार नाही, हे ज्याने ओळखले आहे,
स्वतःच्या हक्काचे काही घेताना लावलेले 'मदती'चे लेबल ज्याला जाचते आहे,
समाज बदलाचे प्रयत्न 'काहीच बदलत नाही', म्हणून ज्याने अर्ध्यावर सोडून दिले आहेत,
मात्र जग बदलू शकते, यासाठीच्या मूलभूत बदलांवर ज्याचा विश्वास आहे,

चांगल्या शिक्षणासाठी सरकारी निधी कमी पडतो, हे कोडे ज्याला सुटत नाही,
चांगल्या आरोग्य सुविधा हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे, असे ज्याला वाटते,
हक्काचे घर होण्यासाठी आयुष्यच गहाण ठेवणे चांगले नाही, असे ज्याचे ठाम मत आहे,
आपल्या जगण्यावर काळा पैसाच राज्य करतो आहे, हे ज्याने ओळखले आहे,

निवडणुका हे भ्रष्टाचाराचे मूळ आहे, त्यामुळे पद्धत बदलीच पाहिजे, असे ज्याला वाटते,
एक चांगली राज्यव्यवस्था म्हणून लोकशाही शासनपद्धतीवर ज्याचा विश्वास आहे,
चांगल्या राज्यघटनेचा अंमल करण्यात देश कमी पडतो आहे, असे ज्याला वाटते,
नागरिकशास्त्राच्या पुस्तकातील लोकांचे कल्याण जो दररोज शोधतो आहे,

प्रत्येकाची पत वाढणे, हाच आर्थिक प्रगतीचा खरा मार्ग आहे, हे ज्याला पटले आहे,
देशातील सध्याच्या करपद्धतीत आमूलाग्र बदल झाला पाहिजे, असे ज्याला वाटते,
आणि करपद्धतीच्या गुंतागुंतीमुळे ज्याला व्यवसाय करणे मुश्कील झाले आहे,
रोखीने होणाऱ्या व्यवहारांमुळे काळा पैसा वाढत चालला आहे, असे ज्याला पटले आहे,
१००, ५००, १००० या मोठ्या नोटा रद्द झाल्या पाहिजेत, हे अर्थशास्त्र ज्याला कळते,
बँकमनी वाढला तरच देशात पारदर्शी व्यवहार वाढतील, असे ज्यांना वाटते,

वाडीवस्त्या, गावे, शहरांतील रस्त्यांचा निकृष्ट दर्जा हा ज्याच्या चिंतेचा विषय आहे,
आपल्या जवळचा, प्रेमाचा माणूस ज्याने अशा रस्त्यांवर गमावला आहे,
दर १५- २० किलोमीटरवर टोल देताना ज्याने प्रत्येक वेळी शिवी हासडली आहे,
काळी-पिवळीतील गोळामोळा झालेली माणसे ज्याने उघड्या डोळ्यांनी पाहिली आहेत,
दररोजच्या प्रवासासाठी सार्वजनिक व्यवस्थेचाच वापर केला पाहिजे, असे ज्याला वाटते,

टाळताच येत नाही म्हणून ज्याने मन मारून लाचही दिली आहे,
आणि मन मारूनच ज्याला व्यवस्थेने लाच घ्यायलाही लावली आहे,
आपण हे, हे आणि हे चुकीचे काम केले, या विचाराने ज्याचे डोके सुन्न झाले आहे,
तरीही ज्याला आपल्या आयुष्यात ‘फिनिक्स उडी’ घ्यायची आहे,

हे आपल्यातले वाद नसून परिस्थितीने टाकलेले जाळे आहेत, हे ज्याने ओळखले आहे,
चित्र पूर्ण होतानाच ते विस्कटल्याचे दुःख ज्याच्या मनात घर करून बसले आहे,
मात्र, ज्याने स्वप्न पाहण्याचे अद्यापही सोडलेले नाही,

जीवघेण्या स्पर्धेतले बळी ज्याने निमूटपणे पाहिले आहेत,
आज तो जात्यात तर आपण सुपात, हा फरक ज्याला कळला आहे,

चंदीमंदीच्या कृत्रिम आणि नैसर्गिक चक्रात जो भरडला गेला आहे,
सरकारच्या एका बिनडोक फटकाऱ्याने ज्याचे आयुष्य उसवले आहे,
बँकेच्या एका नकाराने ज्याची स्वप्न धुळीस मिळाली आहेत,
भांडवलाच्या बिळावर बसलेल्या मालकाच्या मुजोरीने ज्याला बेजार केले आहे,
पुन्हा उठून जगण्याची संधी ज्याला सतत नाकारण्यात आली आहे,
प्रश्नांच्या गर्तेत काही प्रश्नांना उत्तरेच सापडत नाही, असे ज्याला वाटते,
जखमांवर लावण्यात येणाऱ्या मलमपट्ट्यांवर ज्याचा विश्वास नाही,

ज्याला आता मूळ प्रश्नांना भिडण्याचे धाडस करायचे आहे,
ज्याला आता आपले आयुष्य नव्याने जगायचे आहे,
एकेकाला गाठून व्यवस्थेने मिंधे केल्याची सल ज्याच्या मनात आहे,
म्हणून ज्याला आता १२१ कोटी भारतीयांशी नाते जोडायचे आहे,

आणि शब्दात मावणार नाही, असे आयुष्य जगत असलेल्या
१२१ कोटी भारतीयांसाठी, सर्वांसाठी हे निमंत्रण.....,

सध्याच्या एवढ्या सगळ्या नकारांमध्ये....
'आहे... उत्तर आहे....',
असे ज्या 'अर्थक्रांती'चे वर्णन करण्यात येते.....,
त्या 'अर्थक्रांती'ची हाक दिल्लीत पोहचविण्यासाठी,
'आर्थिक स्वातंत्र्याचा जाहीरनामा' सरकारला सुपूर्द करण्यासाठी,
आपल्या सर्वांना १५ ऑगस्ट २०१२ रोजी दिल्लीत भेटायचे आहे ●

**('चलो दिल्ली'विषयी अधिक माहिती पुढील पानावर)**




# चलो दिल्ली

**आपल्या देशासमोरील सध्याच्या कळीच्या प्रश्नांकडे आपले लक्ष वेधण्यासाठी हे पत्र.**

देशातील आर्थिक व्यवहार पारदर्शी व्हावेत म्हणजे 'कॅश'/ 'ब्लॅकमनी' ऐवजी बँकमनी वाढावा, यासाठी 'अर्थक्रांती प्रतिष्ठान' आणि 'अर्थपूर्ण' मासिक प्रयत्नशील आहे.

गेले एक तप कार्यरत असलेल्या 'अर्थक्रांती' चळवळीची आपल्याला माहिती असेलच. भारताच्या राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, श्री श्री रविशंकर, अण्णा हजारे, रामदेवबाबा आणि अशा अनेक मान्यवरांसह हजारो जागरूक नागरिक अर्थक्रांतीच्या पाच कलमांच्या आधारे आपल्या देशात विधायक बदलाचे स्वप्न पाहत आहेत. हे स्वप्न प्रत्यक्षात येण्यासाठी केवळ पदावरील माणसे बदलून उपयोग नाही. त्यासाठी अर्थक्रांतीच्या विचारांचा प्रसार होण्याची गरज आहे.

सध्याच्या अनेक प्रश्नांवरील उत्तर असलेल्या 'अर्थक्रांती'च्या प्रस्तावांवर सरकारने आयोग नेमावा, या मागणीसाठी कमीतकमी १० हजार नागरिकांनी दिल्लीत धडक मारण्याचा संकल्प आहे. या मोहिमेत आपणही सहभागी होऊ शकता.

---

आपले,

**टीम अर्थक्रांती आणि अर्थपूर्ण**

संपर्कासाठी : ०२०३२६००९९६

**www.arthakranti.org**

## आर्थिक स्वातंत्र्याचा जाहीरनामा घेऊन १० हजार नागरिक पुढील वर्षी १५ ऑगस्ट २०१२ (बुधवार)ला दिल्लीत पंतप्रधानांना भेटणार आहेत. आपणही त्यात सहभागी व्हा.

**या मोहिमेत आपण असे सहभागी होऊ शकता**

१.'चलो दिल्ली' मोहिमेसाठी आपले कौशल्य कर्तव्य म्हणून देऊन.

२.अर्थक्रांतीच्या प्रस्तावांचा मित्रांमध्ये प्रसार करून.

३.'चलो दिल्ली' मोहिमेसाठी वर्षभर चालणाऱ्या उपक्रमांत सहभागी होऊन.

४.'चलो दिल्ली' मोहिमेसाठी शक्य असेल तो निधी देऊन.